# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८
## ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३
## कार्यपत्रिका क्र. ५
## सभावृत्तांत

दिनांक :- १४/०७/२०१६ वेळ :- दु. १२.३० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा गुरुवार दिनांक १४/०७/२०१६ रोजी दु. १२.३० वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर अध्यक्षा
२. मा.लोंढे गणेश नारायण
३. मा. शमीम पठाण
४. मा..को-हाळे अनंत सुभाष
५. मा. शिंदे शितल उर्फ विजय गोरख
६. मा.साबळे छाया जगन्नाथ
७. मा.जगताप विमलताई सुरेश
८. मा.बारणे निलेश हिरामण
९. मा.गायकवाड विनय उर्फ विनायक रमेश
१०. मा.स्वाती मयुर कलाटे
११. मा.गोरक्ष दशरथ पाषाणकर स्वीकृत सदस्य

याशिवाय खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा.सुभाष माछरे – क्षेत्रिय अधिकारी ,मा.रविंद्र जाधव प्रशासन अधिकारी तथा सचिव सभाशाखा, मा..रामदास तांबे – कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा विभाग , मा.देवण्णा गटटुवार, - कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग, मा.एम.एस.मोरे – कार्यकारी अभियंता, विदयुत विभाग, मा.सी.बी.कोंडे – उपअभियंता, स्थापत्य , मा..सी.एन.धानोरकर – स्थापत्य विभाग, मा.एन.आर.निंबाळकर – उपअभियंता, स्थापत्य विभाग, मा.एस.एन.वाघ – उपअभियंता, स्थापत्य विभाग, मा.भाऊसाहेब साबळे – उपअभियंता, पाणीपुरवठा, मा.राजेंद्र डुंबरे – उपअभियंता, जलनिसारण विभाग, डॉ.किशोरी नलावडे – वैदयकिय अधिकारी , वैदयकिय विभाग थेरगांव, मा.व्ही.बी.नेमाणे – कार्यालयीन अधिक्षक तथा अतिक्रमण पथक प्रमुख, मा.आर.पी.कोतवाल - क्रिडा पर्यवेक्षक, क्रिडा विभाग, मा.एम.एम.इनामदार, लेखाधिकारी , ब क्षेत्रीय कार्यालय , मा.आर.एन.भाट – प्रभारी सहाय्यक आरोग्याधिकारी इत्यादी.

सर्वप्रथम मा. सभाध्यक्ष आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कामकाजास सुरुवात केली.

अ) तदनंतर मागील कार्यपत्रिका क्र. ४, दि. ७/६/२०१६ रोजीच्या सभेचा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.अध्यक्ष यांनी प्रकट केले.

तदनंतर **उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.४. दिनांक १२/५/२०१६ रोजीच्या प्रभाग समिती बैठकीमध्ये ठराव क्रमांक ८, विषय क्रमांक ५ मध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम २०५ अंतर्गत रस्ता घोषीत करणे अशी दुरुस्ती (वाचावे) करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे मा.आशाताई सुर्यवंशी यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५ ब क्षेत्रीय कार्यालयांतर्गत सालाबाद प्रमाणे मोरया गोसावी उत्सवाकरीता तात्पुरती स्वरुपात ध्वनीक्षेपण प्रकाश जनित्र संच व सीसीटीव्ही यंत्रणेची व्यवस्था करणेकामी येणा-या र.रु.९,४५,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे मा.क्षेत्रिय अधिकारी यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६ ब क्षेत्रीय कार्यालयांतर्गत गणेशोत्सव २०१६ करीता विविध कार्यक्रमाकरीता तात्पुरती स्वरुपात ध्वनीक्षेपण प्रकाश जनित्र संच व सीसीटीव्ही यंत्रणेची व्यवस्था करणेकामी येणा-या र.रु.९,४५,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे मा.क्षेत्रिय अधिकारी यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७ ब क्षेत्रीय कार्यालयांतर्गत मनपा सार्वत्रिक निवडणुक २०१७ करीता तात्पुरत्या स्वरुपात ध्वनीक्षेपण प्रकाश जनित्र संच व सीसीटीव्ही यंत्रणेची व्यवस्था करणेकामी येणा-या र.रु.९,३५,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे मा.क्षेत्रिय अधिकारी यांचा प्रस्ताव..

विषय क्र.८ ब क्षेत्रीय कार्यालयांतर्गत विविध कार्यक्रमांसाठी तात्पुरती स्वरुपात ध्वनीक्षेपण प्रकाश जनित्र संच व सीसीटीव्ही यंत्रणेची व्यवस्था करणेकामी येणा-या र.रु.८,६७,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे मा.क्षेत्रिय अधिकारी यांचा प्रस्ताव.

विषय क्र.९ औष्णिक धुरीकरण कामकाजासाठी डिझेलवर रिक्षा टेम्पो भाडयाने घेण्यासाठी प्रशासकीय मान्यता घेणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.क्षेत्रिय अधिकारी यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१० प्रभाग २३ केशवनगर मध्ये असणा-या जिजाऊ महिला व्यायाम शाळा ही सर्वांसाठी खुली करण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.अनंत को-हाळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.११ मोरया गोसावी राजपार्क बिल्डींगसमोर झोपडपटटया वसलेल्या असून, त्यामुळे नागरीकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून, त्या अनाधिकृत झोपडयांवर कारवाई करण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.अनंत को-हाळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१२ प्रभाग क्रमांक २३ मधील ओपन प्लॉट जे प्लॉट मनपा मालकीचे किंवा वैयक्तीक मालकीचे असतील ते सर्व प्लॉट नागरीकांच्या आरोग्याच्या संबंधीत विचार करता साफ करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.अनंत को-हाळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१३ वाकड स.नं.६३ व ६४ व १५१ मधून होणा-या चौकाला लक्ष्मण चौक (वाकडकर वस्ती) असे नांव देणेस तसेच स.नं. ६४ व ६६ मधून होणा-या चौकाला श्री गणेश युवा मंच चौक (वाकडकर वस्ती) असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.विनायक गायकवाड यांचा प्रस्ताव.

---

ठराव क्र. १९ — विषय क्र. १

दिनांक १४/७/२०१६ — विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.निलेश बारणे — अनुमोदक: मा.शमीम पठाण

संदर्भ :- मा.झामाबाई बारणे यांचा १७/६/२०१५ रोजीचा प्रस्ताव

दिनांक २/५/२०१५ चे श्री.ज्ञानेश्वर रामभाऊ व् इतर या सर्वानी मा.आयुक्त, पिं.चिं.म.न.पा. यांचेकडे दिलेल्या अर्जानुसार आरक्षण क्रमांक ६२८ खेळाचे मैदान गाव मौजे-थेरगांव ता.मुळशी जि.पुणे येथील स.नं.२२/५ मधील क्षेत्र १ हे. ०० आर या मिळकतीचा आगाऊ ताबा पिंपरी चिंचवड मनपा (अ, ब ) पत्राव्दारे पुर्वी दिलेला आहे. या विनंती अर्जानुसार ज्या जमीन मालकांच्या मालकीची जमीन आहे त्यांच्या विनंती नुसार सदर आरक्षण क्रमांक ६२८ खेळाचे मैदानास १) कै.रामभाऊ मोरु बारणे २) कै.बारकु मोरु बारणे असे नांव देवून नामकरण करणेकामीचा प्रस्ताव रदद करुन दप्तरी दाखल करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला

ठराव क्र. २० — विषय क्र. २

दिनांक १४/७/२०१६ — विभाग – स्थापत्य व आरोग्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.स्वाती कलाटे — अनुमोदक: मा.विमलताई जगताप

संदर्भ :- मा.स्वाती कलाटे यांचा दिनांक १/७/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

डांगेचौक ते वाकडगांव या रस्त्याच्या ठराविक अंतरावर नवीन पध्दतीचे ई टॉयलेट तातडीने बसवून मिळावेत तसेच त्यासाठी प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता असावी तसेच नागरीकांच्या भावनांचा आदर करुन तातडीने कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. २१ — विषय क्र. ३

दि. १४/७/२०१६ — विभाग - आरोग्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.शमीम पठाण — अनुमोदक: मा. विमलताई जगताप

संदर्भ :- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील पत्र क्र.बक्षेआ/स्वभा/कावि/१०८/२०१६,
दिनांक ७/७/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

देशातील सर्व शहरांमधील नागरीकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्यमिळावे याकरीता शहरांना स्वच्छतेची सवय व शहरातील सर्व नागरीकांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन देण्याचे ध्येय गाठण्यासाठी दिनांक २/१०/२०१४ पासून केंद्रशासनाने स्वच्छ भारत अभियान (नागरी) संपुर्ण देशामध्ये राबविण्याची घोषणा केलेली आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने देखील पत्र क्रमांक

स्वभाअ/२०१५/प्र.क्र.२३/नवी/३४ दिनांक १५/५/२०१५ अन्वये केंद्रशासनाचे धर्तीवर स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) राबविण्याचे ठरवून दिनांक २/१०/२०१७ पर्यंत हगणदारी मुक्त (open defecation free) शहरे करण्याचे उददीष्ठ निश्चीत केलेले आहे.

त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका ब क्षेत्रीय कार्यालय कार्यक्षेत्रातील सर्व नागरीकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे याकरीता स्वच्छ भारत अभियान व स्वच्छ महाराष्ट्र अभियांन (नागरी) अंतर्गत शौचालयाची सुविधा उपलब्ध नसलेल्या नागरीकांना वैयक्तीक शौचालय सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे तसेच काही ठिकाणी सार्वजनिक शौचालय उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. उघडयावर शौचास जाणा-या नागरीकांचे प्रबधोन करुन त्यांना शौचालयांचा वापर करणेबाबत प्रवृत्त करण्यात येत आहे.

मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडील पत्र क्रमांक मातवी /१२/ कावि/९६/२०१६, दिनांक १/४/२०१६ अन्वये कळविलेनुसार दिनांक २/१०/२०१७ पुर्वी टप्याटप्याने पिंपरी चिंचवड शहर हगणदारी मुक्त करण्याचे उददीष्ठ निश्चीत केलेले आहे त्या अनुषंगाने ब क्षेत्रीय कार्यालय कार्यक्षेत्रातील प्रभाग क्रमांक ४९ बापुजीबुवानगर प्रभाग क्रमांक ५१ गणेशनगर हे दोन प्रभाग दिनांक ३१ जुलै, २०१६ पुर्वी हगणदारी मुक्त (open defecation free) घोषीत करण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. २२ — विषय क्र. ४
दिनांक १४/७/२०१६ — विभाग - नगररचना व विकास विभाग
सुचक : मा.आशाताई सुर्यवंशी — अनुमोदक: मा. निलेश बारणे

संदर्भ :- मा आशाताई सुर्यवंशी यांचा १४/७/२०१५ रोजीचा प्रस्ताव

दिनांक १२/५/२०१६ रोजीच्या प्रभाग समिती ठराव क्रमांक ८, विषय क्रमांक ५ मध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम २०५ अंतर्गत रस्ता घोषीत करणे अशी दुरुस्ती (वाचावे) करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. २३ — विषय क्र. ५
दि. १४/७/२०१६ — विभाग - विदयुत ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा.शमीम पठाण — अनुमोदक: मा.स्वाती कलाटे

संदर्भ :- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील पत्र क्र.बक्षे/वि/जा/१०४/२०१६,
दिनांक १३/७/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

ब क्षेत्रीय कार्यालयांतर्गत सालाबाद प्रमाणे मोरया गोसावी उत्सवाकरीता तात्पुरती स्वरुपात ध्वनीक्षेपण प्रकाश जनित्र संच व सीसीटीव्ही यंत्रणेची व्यवस्था करणेकामी येणा-या र.रु.९,४५,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. २४ — विषय क्र. ६
दि. १४/७/२०१६ — विभाग - विदयुत ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा.स्वाती कलाटे — अनुमोदक: मा.निलेश बारणे

संदर्भ :- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील पत्र क्र.बक्षे/वि/जा/१०५/२०१६,
दिनांक १३/७/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

ब क्षेत्रीय कार्यालयांतर्गत गणेशोत्सव २०१६ करीता विविध कार्यक्रमाकरीता तात्पुरती स्वरुपात ध्वनीक्षेपण प्रकाश जनित्र संच व सीसीटीव्ही यंत्रणेची व्यवस्था करणेकामी येणा-या र.रु.९,४५,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. २५ — विषय क्र. ७

दि. १४/७/२०१६ — विभाग - विदयुत ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.गणेश लोंढे — अनुमोदक: मा.आशाताई सुर्यवंशी

संदर्भ :- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील पत्र क्र.बक्षे/वि/जा/१०६/२०१६,
दिनांक १३/७/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

ब क्षेत्रीय कार्यालयांतर्गत मनपा सार्वत्रिक निवडणुक २०१७ करीता तात्पुरत्या स्वरुपात ध्वनीक्षेपण प्रकाश जनित्र संच व सीसीटीव्ही यंत्रणेची व्यवस्था करणेकामी येणा-या र.रु.९,३५,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

.

ठराव क्र. २६ — विषय क्र. ८

दि. १४/७/२०१६ — विभाग - विदयुत ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.स्वाती कलाटे — अनुमोदक: मा.गणेश लोंढे

संदर्भ :- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील पत्र क्र.बक्षे/वि/जा/१०७/२०१६,
दिनांक १३/७/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

ब क्षेत्रीय कार्यालयांतर्गत विविध कार्यक्रमांसाठी तात्पुरती स्वरुपात ध्वनीक्षेपण प्रकाश जनित्र संच व सीसीटीव्ही यंत्रणेची व्यवस्था करणेकामी येणा-या र.रु.८,६७,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला..

ठराव क्र. २७ — विषय क्र. ९

दि. १४/७/२०१६ — विभाग - आरोग्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.शमीम पठाण — अनुमोदक: मा.स्वाती कलाटे

संदर्भ :- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील पत्र क्र.बक्षेआ/५/कावि/५५७/२०१६
दिनांक १३/७/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

ब क्षेत्रीय कार्यालय कार्यक्षेत्रातील औष्णिक धुरीकरण कामकाजासाठी डिझेलवर रिक्षा, टेम्पो भाडयाने घेणेबाबत संबंधीत आरोग्य निरिक्षक व मुख्य आरोग्य निरिक्षक यांचा क्रमांक ४२७/१६, दिनांक १२/७/२०१६ रोजीचा अहवाल आलेला आहे. सदर अहवालानुसार औष्णिक धुरीकरण कामकाजासाठी डिझेलवर रिक्षा, टेम्पो भाडयाने घेणेबाबत एक दिवसासाठी एक डिझेल रिक्षा टेम्पो भाडयाने घेणेबाबत र.रु.७५०/- इतका दर दिलेला आहे. आरोग्य निरिक्षक व मुख्य आरोगय निरिक्षक यांनी दिलेल्या अहवालातील अंदाजपत्रकानुसार ब क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील औष्णिक धुरीकरण कामकाजासाठी वाहन भाडयाने घेणेबाबत निविदा कामकाजासाठी ८ तासाकरीता एक नियमित डिझेल तीन चाकी वाहनासाठी अंदाजे ३०० दिवसांसाठी र.रु.७५०/- प्रमाणे र.रु.२,२५,०००/- व आवश्यकता भासलेस अतिरिक्त दोन डिझेल तीन चाकी वाहनासाठी र.रु.७५०/- प्रमाणे र.रु.४,५०,०००/- असे एकुण र.रु.६,७५,०००/- इतका खर्च एक वर्षे कालावधीकरीता अंदाजे खर्च अपेक्षीत आहे. सन २०१६-१७ करीता औष्णिक धुरीकरण कामकाजसाठी वाहन भाडयाने घेणेबाबत अंदाजपत्रकीय तरतुद र.रु.७,००,०००/- इतकी करण्यात आलेली आहे. सदरच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.
सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. २८ विषय क्र. १०
दि. १४/७/२०१६ विभाग - कला व सांस्कृतिक क्रिडा विभाग
सुचक : मा.अनंत को-हाळे अनुमोदक: मा.विनय गायकवाड

संदर्भ :- मा.अनंत को-हाळे यांचा दिनांक १४/७/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

आजकाल महिला व पुरुष सर्वच व्यायाम शाळेत एकत्रीत व्यायाम करतात. तसेच त्या ठिकाणी येणा-या महिलांची संख्या कमी असल्याने भागातील तरुण मुले मुली , पुरुष व महिला यासर्वांसाठी त्याचा वापर करता यावा. म्हणून प्रभाग २३ केशवनगर मध्ये असणा-या जिजाऊ महिला व्यायाम शाळा ही सर्वांसाठी खुली करण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. २९ विषय क्र. ११

दि. १४/७/२०१६ विभाग – १) झोनिपु विभाग
२) बांधकाम परवानगी व अनाधीकृत बांधकाम नियंत्रण विभाग

सुचक : मा.अनंत को-हाळे अनुमोदक: मा.विनय गायकवाड

संदर्भ :- मा.अनंत को-हाळे यांचा दिनांक १४/७/२०१६ रोजीचा प्रस्ताव ..

मोरया गोसावी राजपार्क XYZ बिल्डींगसमोर झोपडपटटया वसलेल्या असून, त्यामुळे नागरीकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून, त्या अनाधिकृत झोपडयांवर कारवाई करण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ३० विषय क्र. १२
दि. १४/७/२०१६ विभाग – आरोग्य ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा.अनंत को-हाळे अनुमोदक: मा.विनय गायकवाड

संदर्भ :- मा.अनंत को-हाळे यांचा दिनांक १४/७/२०१६ रोजीचा प्रस्ताव ..

प्रभाग क्रमांक २३ केशवनगरमधील ओपन प्लॉट जे प्लॉट मनपा मालकीचे किंवा वैयक्तीक मालकीचे असतील ते सर्व प्लॉट नागरीकांच्या आरोग्याच्या संबंधीत विचार करता साफ करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ३१ विषय क्र. १२

दि. १४/७/२०१६ विभाग – स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.विनय गाकयवाड अनुमोदक: मा.अनंत को-हाळे

संदर्भ :- मा.विनय गायकवाड यांचा दिनांक १४/७/२०१६ रोजीचा प्रस्ताव

वाकड स.नं.६३ व ६४ व १५१ मधून होणा-या चौकाला लक्ष्मण चौक (वाकडकर वस्ती) असे नांव देणेस तसेच स.नं. ६४ व ६६ मधून होणा-या चौकाला श्री गणेश युवा मंच चौक (वाकडकर वस्ती) असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला .

वरील प्रमाणे सभेचे कामकाज झाले मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/-
[सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

पिंपरी चिंचव महानगरपालिका,
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बक्षे/सभाशाखा/२/कावि/ ३०२ /२०१६.
दिनांक : ०४ / ०८ /२०१६

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव( सभाशाखा )
ब प्रभाग समिती

प्रत -सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना